श्री साईनाथ प्रसन्न

# श्री सा[illegible]

वर्ष १ लें. ] मार्गशीर्ष शके १८८५ [ अंक १० वा.

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवितमतिशय चपलम् ॥



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
श्री शंकराचार्य.

संपादक :— लक्ष्मण गणेश महाजनी
प्रकाशक :— रामचंद्र आत्माराम तर्खड
श्री साई [illegible]

# अनुक्रमणिका.


महाराजांचे अनुभव ... ... ... ८०-८९

महाराजांची बोधपद्धति ... ... ... ५-६

श्री साईसच्चरित ... ... ... १८५-२१६


## खुलासा.

श्री साईलीलेच्या पृष्ठावर जे अंक देण्यांत येतात त्यासंबंधीं कांहीं वाचकांचा गैरसमज होत आहे असें दिसतें. पृष्ठावरील अंक निरनिराळ्या विषयाला निरनिराळे दिले आहेत. हेतु हा कीं, शेवटीं पुस्तकें बांधतांना विषयवारीप्रमाणें तीं बांधवितां यावी. या व्यवस्थेमुळें पृष्ठावरील अंकांत विषमता दिसल्यास म्हणजे २६ पृष्ठापुढें ४२ वें पृष्ठ आल्यास मधलीं २७ ते ४१ पृष्ठें आपल्याला कमी आलीं किंवा पृष्ठांक चुकीचे पडले आहेत असा समज वाचकांनीं करून घेऊं नये.

---

## विनंति.

श्री साईलीलेचे अंक दर महिन्यास शुद्ध ११ पर्यंत सर्व पोष्टांत पडतात व ते ग्रहकांना दर महिन्यास पौर्णिमेपर्यंत बहुतेक पोहोंचले पाहिजेत. पोष्टांत क्वचित अंक गहाळ होत असतील, व त्यामुळें जर ग्राहकानीं अंक न मिळाल्याची तक्रार पौर्णिमेपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल. कित्येक ग्राहकांची एखादा अंक न मिळाल्याची तक्रार २।३ महिन्यानीं उशिरां येते. इतक्या उशिरा पुन्हां अंक पाठविणें अशक्य असल्यामुळें ही सूचना देणें भाग पडत आहे.

---

"वार्षिक वर्गणी तीन रुपये. टपाल हांशीलसह तीन रुपये सहा आणे. व्ही. पी. नें तीन रुपये आठ आणे. फुटकळ अंकास पांच आणे."

---

(४७)

ठाणें जिल्ह्यांत वेळापुराजवळ तुमगांवीं शांताबाई या नांवाची बाई रहात असे. तिच्या डाव्या हाताच्या आंगठ्यास हाडव्रण झाला होता; तो सात वर्षे होता. मग एके रात्रीं महाराजांनी तिला स्वप्नांत जाऊन सांगितलें 'तूं डिकेमाली लाव.' बाई जागी झाली, तो तिला मोठा आनंद वाटूं लागला व तिनें व्रणाला डिकेमाली लावली व तिचा व्रण बरा झाला. तिनें मग या सर्व मजकुराचें कार्ड महाराजांस लिहून कळविलें. त्या कार्डावर तारीख १ सप्टेंबर १९१८ ही आहे.

(४८)

शिर्डीस रामलाल नांवाचा पंजाबी ब्राह्मण असे. तो मुंबईस असतांना त्याच्या स्वप्नांत महाराज आले व म्हणाले 'माझ्याकडे ये.' त्याला महाराजांचें दर्शन कधींही घडलें नव्हतें व त्यानें फोटोही पाहिला नव्हता. तेव्हां हे स्वप्नांत आलेले महाराज कोण हे त्याला ओळखतां येईना. दुसरे दिवशीं रस्त्यानें जातांना त्याला एका दुकानांत महाराजांचा फोटो दिसला. त्यानें दुकानदाराला विचारलें हा फोटो कोणाचा आहे व महाराज कोठें असतात. दुकानदारानें सर्व हकीगत सांगितली व रामलाल शिर्डीस गेला व तेव्हांपासून तो महाराजांचे देहावसनापर्यंत तेथें राहिला.

(४९)

नारायण गोपिनाथ दिवे या नांवाचे गृहस्थ मुंबईस राहत असत. त्यांचे पोटांत एक गांठ उत्पन्न झाली. ती फार कठीण होती व तिच्या पासून त्यांना फार त्रास होऊं लागला. मुंबईस एक दोन प्रसिद्ध डाक्टरांना दाखविली पण कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें त्यांना महाराजांकडे जाण्याविषयीं एका गृहस्थानें सुचविलें. अर्थात तशा स्थितींत जाणें शक्य नव्हतें. ते म्हणाले महाराजांचे आशिर्वादानें ही गांठ फुटून आंतला रोग मळाच्या द्वारानें जाईल तर मला कांहीं बरें वाटेल व मी महाराजांकडे जाऊं शकेन. त्यावर त्या गृहस्थानें त्यांना महाराजांची उदी दिली व तिचें त्यानें सेवन केलें व दुसरे दिवशीं सकाळीं गांठ फुटून आंतला प्

शौचाच्या द्वारानें जाऊं लागल्या व दोन चार दिवसांत त्यांना बरें वाटूं लागलें. मग लौकरच ते महाराजांचे दर्शनास गेले.

( ५० )

एकदां मी सकाळीं कांहीं वाचित असतां एका प्रश्नासंबंधानें बराच घोटाळा वाटला त्याबद्दल कांहीं उलगडा होईना. शेवटीं तें प्रकरण तसेंच टाकून मी जेवायाला बसलों व जेऊन ऑफीसांत जाण्यासाठीं निघालों. आगगाडींत बांद्र्याचें स्टेशनावर मला माझ्या एका मित्रानें पाहिलें म्हणून ते मित्र माझ्याच डब्यांत येऊन बसले. पुढें माहीमच्या स्टेशनवर त्या मित्राच्या ओळखीचे एक गृहस्थ त्याच डब्यांत आले. बांद्र्याच्या स्नेह्यानीं त्या गृहस्थाची व माझी ओळख करून दिली. व त्या दिवशीं माझ्या घरीं होणाऱ्या कीर्तनाचें मी त्यांना आमंत्रण दिलें. बांद्रेकर दादरास उतरून गेले व माहीमकर डब्यांतच होते. ते मजबरोबर कांहीं बोलले नाहींत परंतु ते कांहीं लिहित आहेत असें मला दिसलें. ग्रांटरोड स्टेशनावर ते उतरले व उतरतांना त्यांनीं लिहिलेला कागद माझ्या हातांत दिला. त्यांत एक अभंग होता व त्या अभंगानें माझ्या मनांत उद्भवलेल्या घोटाळ्याच्या प्रश्नाचा उलगडा झाला. अशा तऱ्हेनें पुष्कळ वेळां घोटाळे अचानक घडून येणाऱ्या गोष्टीनें दूर झाले असे अनुभव आले आहेत.

( ५१ )

शिर्डीस एकदां एक कर्णपिशाच्च साध्य करून घेतलेले ज्योतिषीबुवा गेले होते. ते महाराजांच्या दर्शनास गेले पण त्यांचें लक्ष पैशाकडे बरेंच होतें; तेथें त्यांना पैसा मिळण्याचा फारसा संभव वाटला नाहीं म्हणून ते दर्शन घेऊन लवकरच रहाट्यास गेले. तेथें रात्रीं त्यांना विंचू चावला. फार वेदना होऊं लागल्या तेव्हां त्यांनीं महाराजांनीं दिलेली उदी लाविली व एकसारखें महाराजांचें नामस्मरण चालू केलें, त्यामुळें वेदना थांबल्या व त्यांची महाराजांवर श्रद्धा बसली व दुसरे दिवशीं जोशीबुवा सकाळींच पुन्हा शिर्डीस गेले तेथें. त्यांचें १५।२० दिवस रहाणें झालें व महाराजांच्या कृपेनें त्यांना तेथें अजमासे २०० रुपये मिळाले.

# श्रीसाईनाथ सगुणलीला.

## स्वानुभव.

लेखक:—के. जे. भीष्म.

श्रीसद्गुरूनें दिलेला उपदेश त्यांनीं दाखविलेलें स्वरूप व दिलेला अनुभव हा कोणास सांगू नये अशी सर्वत्र समज आहे; व याबद्दल "गुरुकृपका अंजन पाया मेरा मैं जानूं ॥ आपरूप नयनोमें छाया मेरा मैं जानूं" या देवनाथांच्या पदाचा आधार देऊन हरिदास मंडळी या मताचें दृढीकरण करितात. परंतु त्यांच्या उलट स्वत: संतशिरोमणी तुकाराम महाराज आपल्या अभंगांत स्वानुभव लिहितात.

### अभंग.

सद्गुरुरायें कृपा मज केली ॥ नाहीं घडली सेवा कांहीं॥१॥ सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना ॥ मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥ २ ॥ भोजनामागतीं तूप पावशेर ॥ पडिला विसर स्वप्नामाजी ॥३॥ कांहीं कळें उपजला अंतराय ॥ म्हणोनीया काय त्वरा जाली ॥ ४ ॥ राघव चैतन्य केशव चैतन्य ॥ सांगितली खूण मालिकेची॥५॥ बाबाजी आपलें सांगितलें नाम ॥ मंत्र दिला रामकृष्ण हरी ॥ ६ ॥ माघ शुद्ध दशमी पाहूनी गुरुवार ॥ केला अंगिकार तुका म्हणे ॥ ७ ॥

हा त्यांनीं स्वप्नांत झालेला दृष्टांत व दिलेला मंत्र त्यांनीं लिहून ठेविला. ह्यावरून स्वानुभव कोणास सांगू नये असें सिद्ध होत नाहीं. मग वरील 'मेरा मैं जानूं' ह्या उपदेशाचा विचार पडला. संपूर्ण पद माझ्या हातीं आलें तें असें.

## पद देवनाथांचें

गुरुकृपेका अंजन पाया मेरा मैं जानूं ॥ आपरूप नयनोंमे छाया मेरा मैं जानूं ॥ ध्रु० ॥ उलट मार्गकी रहा बतायी मेरा मैं जानूं ॥ बुरे करमकी रेख मिटाई मेरा मैं जानूं ॥ १ ॥ चांदसुरजबिन परा उजाला मेरा मैं जानूं । पिलाया अजरामरका प्याला मेरा मैं जानूं ॥ २ ॥ जहांतहां मैं आप अकेला मेरा मैं जानूं ॥ आपहि गुरु और आपहि चेला मेरा मैं जानूं ॥ ३ ॥ गोविंदनाथनें यहि बतलाया मेरा मैं जानूं ॥ देवनाथ अपनेमे मिलाया मेरा मैं जानूं ॥ ४ ॥

हें संपूर्ण पद पाहिल्यावर हरदासी शिक्षणानें झालेल्या वृत्तींत बदल झाला. वरील पदांत देवनाथानीं आपला संपूर्ण अनुभव सांगितला आहे. प्रत्येक कडव्यांत अनुभव सांगून पुन: 'मेरा मैं जानूं' हें ध्रुवपद कायम ठेविलें. त्याचा अर्थ इतकाच कीं सद्गुरूनें जो जो उपदेश केला, जें जें स्वरूप दाखविलें, जो जो मार्ग सांगितला, व गुरूच्या कृपेनें काय फलप्राप्ति होते हें सांगितलें. पण त्या फलप्राप्तीपासून जो आनंद होतो त्याची परिमिति किती आहे हें सांगतां येत नाहीं. असें साखर गोड असते हे गुरूनें सांगितल्यावर ती शिष्यानें खाल्ली असतां गोड लागली इतकेंच सांगेल, पण गोड कशी लागली हें त्याला सांग म्हटलें तर तो सांगूं शकत नाहीं. त्यानें तत्सदृश पदार्थाचें नांव सांगितलें तरी त्या पदार्थाविषयीं पुन्हां वरील प्रश्न उद्भवतो. म्हणून त्या स्थितीला मात्र 'मेरा मैं जानूं' इतकेंच सांगतां येतें.म्हणून याच धोरणानें पुढील अनुभव लिहिला आहे.

स्वतांचा अनुभव लिहिणें म्हणजे स्वतःची योग्यता प्रगट करणें नव्हे तर सद्गुरूचें महिमान वर्णन करणें आहे; म्हणून आतां स्वानुभव लिहिण्याला प्रारंभ केला.

नागपूर जिल्ह्यांतील बोरी या गांवी वास्तव्य करीत असतां कुटुंब निवर्तल्यावर पुन्हा संसारांत पडावें कीं नाहीं या विचारांत बराच काळ गेला. पुष्कळ इष्टमित्रांनीं पुनः संसार थाटण्याचा उपदेश केला; पण संसार करावा असें मनच होईना. शेतीवाडी करून निर्वाह चालविला व मित्रमंडळीनेंही साह्य केलें परंतु मनाचा अस्थिरपणा जाईना. अशा रीतीनें कांहीं काळ निघून गेल्यावर शके १८३० श्रावण महिन्याच्या पौर्णिमेस रात्रीं मला एक स्वप्न पडलें. त्यांत एक काळ्या वर्णाचा पुरुष ज्याच्या अंगास केशरी रंगाची उटी लागली आहे,कपाळास त्रिपुंड्र आहे, व पादुकांचीही गंधपुष्पानें पूजा झाली आहे, असा स्वप्नांत येऊन त्यानें माझे हातीं एक वर्तमानपत्र दिलें. मी त्यांना विचारलें आपण कोण व आपलें नांव काय तेव्हां त्यांनीं माझ्याशीं संभाषण न करितां त्या वर्तमानपत्रांकडे बोट दाखविलें. मीं त्याकडे पाहिलें तों त्यावर " सच्चिदानंद " ही ठळक अक्षरें दिसलीं. तितक्यांत त्या पुरुषानें 'वाच' अशी आज्ञा दिली. तेव्हां पुनः त्या पत्राकडे पाहू लागलों तों एकेजागीं 'मंत्र व शिकावा' असें लिहिलें होतें. हें काय, याचा अर्थ काय वगैरे प्रश्न करण्याचा जों विचार करितों तों तो पुरुष नाहीं व वर्तमानपत्रही नाहीं. तेव्हां मी विस्मित झालों, इतक्यांत माझ्या मित्रानें दार ठोठावलें त्याबरोबर माझी झोंप गेली; व ताबडतोब हें स्वप्न डायरीवर लिहून ठेवलें. पण या स्वप्नाचें कोडें कांहीं उमजेना. कांहीं दिवसांनीं तेथें एक गाणपत्य साधु आले त्यांना हें स्वप्न सांगितल्यावर ते म्हणाले सच्चिदानंद स्वामी तुमचे गुरू आहेत व त्यांनीं 'वशीकावा' हा मंत्र दिला. हें समजल्यावर आनंद झाला.

---

कांहीं दिवसांनीं उमरावतीस जाणें झालें तेव्हां दादासाहेब खापर्डे म्हणाले शिर्डीस चलता काय ? मी होय म्हटलें व त्यांचे समागमें शिर्डीस गेलों. शिर्डीस जाण्याबरोबर साईबाबाचें दर्शन घेतलें व आम्ही सर्वांनीं नमस्कार केला.मी नमस्कार करण्याबरोबर बाबांनीं हात जोडले व ' जय सच्चिदानंद ' असें तोंडानें म्हणाले- तेव्हां मी जास्त घोटाळ्यांत पडलों. स्वप्नांत दिसलेले सच्चिदानंद व हे एक कीं दोन ? एक म्हणावें तर ते वैष्णव होते व हे यवन आहेत.दोन म्हणावें तर यांनीं मला पहाण्याबरोबर

सच्चिदानंदाचें नांव कां घेतलें? अशा विचारांत पडलों. तेथें सर्व हिंदु ब्राह्मणासुद्धां बाबांचें चरणोदक घेत असत, पण मी मात्र तें घेत नसें. बाबा तंबाखूची चिलीम पीत असत व आपली चिलीम दुसऱ्यास देत असत. मी बाबांचे अगदीं जवळ बसत असें, पण मला त्यांनीं चिलीम कधीं दिली नाहीं. पण एक दिवसाचा प्रसंग असा आला कीं, आम्ही सर्व मंडळी दर्शन घेऊन बाबाजवळ बसलों. बाबांच्या चमत्कारिक गोष्टी चालल्या आहेत, इतक्यांत एकानें चिलीम भरली व बाबांचे हातीं दिली.बाबांनीं ती नुसती तोंडास लावली व माझ्या हातीं दिली व 'पी' म्हणाले. तेव्हां त्यांचे आज्ञेप्रमाणें चिलीम प्यालों व ती बाबांचे हातीं दिली ती त्यांनीं घेतली व तोंडानें 'आपण सगळीकडे फिरतों गड्या: मुंबई, पुणें, सातारा, नागपूर हीं सगळीं शहरें रामानें भरलीं आहेत.' असें बोलून मला एकदम म्हणाले 'तूं लाडू एकटा एकटाच खातोस आम्हास एकही देत नाहीस. आतातरी तूं मला पांच लाडू दे' बाबा प्रत्येकास दक्षिणा मागत असत व त्याचा विनियोग ते परोपकाराकडे करीत असत हें इतरत्र आलेलेंच आहे.

'आम्ही सगळीकडे फिरतों व पांच लाडू दे' या बाबांच्या वाक्यानें माझे मनावर निराळाच परिणाम झाला. स्वप्नांत दिसलेले सच्चिदानंद वेगळे व साईनाथ वेगळे ही भावना तत्काल नाहींशी झाली व तीर्थ वाटणाराकडून बुध्या तीर्थ मागून घेतलें व बाबांच्या पायावर डोकें ठेवलें. त्यावेळेस बाबांनी आपला वरदहस्त मस्तकावर दोन मिनिटें ठेविला. तेव्हां मनाची स्थिति काय झाली हें मात्र 'मेरा मैं जानूं' इतकेंच म्हणतां येतें.

( अपूर्ण )

## श्रीसमर्थांची बोधपद्धति

वेदांत ग्रंथांतून प्रपंचाविषयीं बोलतांना निरनिराळे दृष्टांत देण्यांत येतात. उदाहरणार्थ रज्जुसर्प, मृगजळ, हेम व अलंकार, माती व घट वगैरे. हे सर्व दृष्टांत एकाच तऱ्हेचे नाहींत. रज्जुसर्प म्हणजे दोरी असून तेथें दोरीच्या ठिकाणीं सर्प भासतो. मृगजळ म्हणजे नुसत्या उखर जमिनीवर सूर्यकिरण पडलेले असून तेथें जळ भासतें. या दोन्ही दृष्टांतांत असलेली वस्तु न भासतां तेथें मुळींच नसलेली वस्तु भासते. बाकीच्या दोन दृष्टांतांचा प्रकार निराळा आहे. हेम म्हणजे सोनें, आणि अलंकार म्हणजे दागिने. यांत, असलेल्या वस्तूलाच निराळे आकार दिलेले असतात, आणि ती वस्तु त्या त्या आकारांत उघड दिसते. तसेंच माती व घट यांतही निरनिराळ्या आकारांत वस्तु उघड दिसते. पहिले दोन दृष्टांत एका तऱ्हेचे असून दुसरे दोन दृष्टांत निराळ्या तऱ्हेचे आहेत. या दोन तऱ्हांपैकीं कोणत्या तऱ्हेचे दृष्टांत प्रपंचाला खरे लागू आहेत, या संबंधानें मला मुळींच उलगडा होईना व हा उलगडा व्हावा अशी एक दिवस मनामध्यें अत्यंत आतुरता उत्पन्न झाली. अशी आतुरता उत्पन्न झाल्यावर दहा पांच मिनिटांनींच महाराजांकडून एका गृहस्थाबरोबर निरोप आला. तो गृहस्थ म्हणाला "महाराजांनीं आपल्याजवळ शंभर रुपये मागितले आहेत." मजजवळ त्या वेळेला फक्त एकच रुपया होता आणि तोही मुकाम करून गेलेल्या एका गुरुपौर्णिमेला महाराजांनीं आपल्या खिशांतून काढून दिलेला तोच. अर्थात् तो रुपया ते परत मागण्याचा संभव नव्हता. आलेल्या गृहस्थाला मी वस्तुस्थिति सांगितली आणि महाराजांस माझा शिरसाष्टांग प्रणिपात निवेदन करावयाची विनंति केली. तो गृहस्थ गेल्यावर माझ्या मनानें घेतलें कीं महाराजांनीं उच्चारलेल्या वाक्यांत मी शोधीत असलेला उलगडा असला पाहिजे. कोणा जवळ खरोखर कोणत्या वेळीं किती शिल्लक आहे हें महाराजांना अंतर्ज्ञानानें कळतें असा आमचा सर्वांचा नित्याचा अनुभव असल्यामुळें महाराजांचा हेतु खरोखरीच शंभर रूपये मागावयाचा नसून मला बोध करावयाचा व माझ्या मनांतला घोटाळा काढून टाकावयाचा हाच असला पाहिजे, असें

माझ्या मनांत पक्कें बिंबलें आणि तेथें असलेल्या महाराजांच्या तसबिरीपुढें साष्टांग नमस्कार करून "शंभर रुपयांचा" अर्थ मला कळावा अशी प्रार्थना केली. या नंतर दोन चार मिनिटांतच महाराजांच्या कृपेनें "शंभर रुपयांचा" अर्थ स्फुरला व त्यानें माझ्या मनांतील घोटाळा साफ नाहींसा होऊन पूर्ण समाधान वाटलें. तो अर्थ असा: हे दोन्ही तऱ्हेचे दृष्टांत प्रपंचाला लागू आहेत पण ते निरनिराळ्या अंगाचे द्योतक आहेत. प्रपंच हा शंभरासारखा आहे. शंभर म्हणजे एक आणि त्यावर दोन शून्यें; तसा प्रपंच म्हणजे सत् असें जें ब्रह्म; त्यावर भासणारें मिथ्या नामरूपात्मक जग. सत् म्हणजे एक आणि नाम व रूप हीं त्यावरील शून्यें. सत् म्हणजे अधिष्ठान याचे दर्शक दृष्टांत हेम व अलंकार आणि माती व घट हे होत. अलंकारांत जसें सोनें किंवा घटांत जशी माती तसें अधिष्ठानांत सत् आहे आणि तें नाशिवंत नाहीं किंवा भासमात्र नव्हे. म्हणजे तें शून्य नसून एक आहे आणि त्या एकाच्या आधारानेंच वर असणाऱ्या शून्यांना किंमत आहे. वरील शून्यें गेलीं तरी एक याला धक्का पोंहोचत नाहीं. रूप व नांव हीं मिथ्या असून केवळ भासतात, म्हणजे तीं शून्यें आहेत. त्यांचे दर्शक दृष्टांत म्हणजे मृगजळ, रज्जू सर्प, हीं होत. नामरूपासारखें जळ आणि सर्प मिथ्या असून नुसते भासमान आहेत. अर्थात् तींही शून्यें आहेत. अशा तऱ्हेनें दोन्ही तऱ्हेच्या दृष्टांतांची समर्पकता माझ्या मनाला पटली आणि मला फार आनंद झाला.

प्रतिमा स्थंडिल अग्नि तेज । सूर्यमंडल उदक द्विज ॥
या सातांही वरी गुरुराज ॥ अनन्य पूजन करूं कीं ॥ ८

चरण धरितां अनन्यभावें । गुरुचि काय परब्रह्म हेलावें ॥
ऐसे गुरुपूजेचे नवलावे । अनुभवावे गुरुभक्तें ॥ ९ ॥

पूजक जेथवर साकारू । देहधारीच आवश्यक गुरू ॥
निराकारास निराकारू । हा निर्धारू शास्त्राचा ॥ १० ॥

न करितां सगुणाचें ध्याना । भक्ति भाव कदा प्रगटेना ॥
आणि सप्रेम जंव भक्ति घडेना । कळी उघडेना मनाची ॥ ११ ।

ते उमलल्यावीण कांहीं । केवळ कर्णिकेस गंध नाहीं ॥
ना मकरंद ना भ्रमर पाहीं । तेथ राहील क्षणभर ॥ १२ ॥

सगुण तेंचि साकार । निर्गुण तें निराकार ॥
भिन्न नाहीं परस्पर । साकार निराकार एकचि ॥ १३ ॥

थिजलें तरी तें घृतची संचलें । विघुरलें तेंही घृतचि म्हणितलें ॥
सगुण निर्गुण एकचि भरलें । समरसलें विश्वरूपें ॥ १४ ॥

डोळे भरुनी जें पाहूं येई । पदीं ज्याच्या ये ठेवितां डोई ॥
जेथ ध्यानाची लागे सोई । आवडी होई तें ठायीं ॥ १५ ॥

जयाचिये संगती । प्रेमवार्ता करूं येती ॥
जयास पुजूं ये गंधाक्षतीं । म्हणूनी आकृति पाहिजे ॥ १६ ॥

निर्गुणाहून सगुणाचें । आकलन बहु सुकर साचें ॥
दृढावल्या प्रेम सगुणाचें । निर्गुणाचें बोधनतें ॥ १७ ॥

भक्तां निर्गुण ठायीं पडावें । बाबांनीं अनंत उपाय योजावे ॥
अधिकारानुरूप दूर बसवावें । दर्शन वर्जावें बहुकाळ ॥ १८ ।

एकास देशांतरा पाठवावें । एकास शिरडींत एकांतीं कोंडावें ॥
एकास वाड्यांत अडकवावें । नेम द्यावे पोथीचें ॥ १९ ॥

वर्षानवर्ष हा अभ्यास । होतां वाढेल निर्गुणध्यास ॥
आसनीं शयनीं भोजनीं मनास । जडेल सहवास बाबांचा ॥२०॥

देह तरी हा नाशिवंत । कधीं तरी होणार अंत ॥
म्हणूनि भक्तीं न करावी खंत । अनाद्यनंत लक्षावें ॥ २१ ॥

हा बहुविध दृश्य सारा । सकल अव्यक्ताचा पसारा ॥
अव्यक्तांतून आला आकारा । जाणार माघारा अव्यक्तीं ॥२२॥

ही आब्रह्मस्तंब सृष्टी । व्यष्टी जैसी तैसी समष्टी ॥
उपजली ज्या अव्यक्तापोटीं । तेथेंच शेवटीं समरसे ॥ २३ ॥

म्हणवून कोणासही ना मरण । मग तें बाबांस तरी कोठून ॥
नित्य शुद्धबुद्धनिरंजन । निर्मरण श्रीसाई ॥ २४ ॥

कोणी म्हणोत भगवद्भक्त । कोणी म्हणोत महाभागवत ॥
परी आम्हांस ते साक्षात भगवंत । मूर्तिमंत वाटले ॥ २५ ॥

गंगा समुद्रा भेटूं जाते । वाटेनें तापार्ता शीतल करिते ॥
तीरींचे तरूंस जीवन देते । तृषा हरिते सकळांची ॥ २६ ॥

तैसीच संतांची अवतार स्थिति । प्रगट होती आणि जाती ॥
परी तयांची आचरीती रीती । पावन करिती जगातें ॥ २७ ॥

कमालीची क्षमाशीलता । नैसर्गिक विलक्षण अक्षोभ्यता ॥
ऋजुता मृदुता सोशीकता । तैसीच संतुष्टता निरुपम ॥ २८ ॥

दिसाया जरी देहधारी । तरी तो निर्गुण निर्विकारी ॥
निःसंग निर्मुक्त निज अंतरीं । प्रपंचीं जरी विचरला ॥ २९ ॥

कृष्ण स्वयें जो परमात्मा । तोही म्हणे संत मदात्मा ॥
संत माझी सजीव प्रतिमा । संत समेमा तो मीच ॥ ३० ॥
प्रतिमारूपही संतां न साजे । संत निश्चळ स्वरूप माझें ॥
म्हणवूनि मद्भक्तांचें ओझें । तयांचें लाजे मी वाहें ॥ ३१ ॥
संतांसी जो अनन्यशरण । मी हो वंदीं तयाचें चरण ॥
ऐसें वदला उद्धवा आपण । संत महिमान श्रीकृष्ण ॥ ३२ ॥
सगुणांतला जो सगुण । निर्गुणांतला जो निर्गुण ॥
गुणवंतांतील जो अनुत्तम गुण । गुणियांचा गुणिया गुणि राजा ॥३३॥
पर्याप्त काम जो कृतकृत्य । सदा यदृच्छा लाभ तृप्त ॥
जो अनवरत आत्मनिरत । सुखदुःखातीत जो ॥ ३४ ॥
आत्मानंदाचें जो वैभव । कोणा वर्णवेल तें गौरव ॥
अनिर्वाच्य सर्वथैव । ब्रह्म दैवत मूर्त जो ॥ ३५ ॥
कीं ही अनिर्वचनीय शक्ति । दृश्य रूपें अवतरली क्षितीं ॥
सच्चित्सुखानंदाची मूर्ति । ज्ञान संवित्ती तीच ती ॥ ३६ ॥
ब्रह्माकारांतःकरणमूर्ति । झाली जयाची प्रपंचीं निवृत्ति ॥
नित्य निष्प्रपंच ब्रह्मात्मैक्यस्थिति । आनंदमूर्ति केवळ ती ॥ ३७ ।
आनंदोब्रह्मेति श्रुति । श्रोते नित्य श्रवण करिती ॥
पुस्तकज्ञानी पोथींत वाचिती । भाविकां प्रतीति शिरडींत ॥ ३८ ।
धर्माधर्मादि ज्याचें लक्षण । तोहा संसार अति विलक्षण ॥
अनात्मज्ञांसी अनवेक्षण । करणें रक्षण प्राप्त कीं ॥ ३९ ॥
परी हा न आत्मज्ञांचा विषय । तयांसीं आत्मस्वरूपींच आश्रय
तें नित्य मुक्त आनंदमय । सदा चिन्मयरूप जे ॥ ४० ॥

बाबाच सर्वांचें अधिष्ठान । तयांस केउतें आसन ॥
त्याही वरी रौप्य सिंहासन । भक्तभावनपरि बाबा ॥ ४१ ॥
बहुतां दिसांची जुनी बैठक । गोणत्याचा तुकडा एक ॥
त्यावरि घालिती भक्त भाविक । गादी सुरेख बैसाया ॥ ४२ ॥
मागील टेकायाची भिंत । तेथें तक्या ठेविती भक्त ॥
जैसें भक्तांचे मनोगत । बाबाही वागत तैसेंच ॥ ४३ ॥
वास्तव्य दिसे शिरडींत । तरी ते होते सर्वगत ॥
हा अनुभव निजभक्तांप्रत । साई नित दाखवित ॥ ४४ ॥
स्वयें जरी निर्विकार । अंगिकारित पूजा उपचार ॥
भक्तभावार्थानुसार । प्रकार सर्व स्वीकारित ॥ ४५ ॥
कोणी करीत चामरांदोलन । कोणी तालवृन्त परिवीजन ॥
सणया चौघडे मंगल वादन । कोणी समर्पण पूजेचें ॥ ४६ ॥
कोणी हस्त पाद प्रक्षालन । कोणी अत्तर गंधार्चन ॥
कोणी त्रयोदशगुणी तांबूल दान । निवेदन महानैवेद्या ॥ ४७ ॥
कोणी दुबोटी आडवें गंध । शिवलिंगा तैसें चाचती मलंग ॥
कोणी कस्तूरीमिश्रित सुगंध । तैसेंच चंदन चर्चीत ॥ ४८ ॥
तात्यासाहेब नूलकरांचे । स्नेही डॉक्टर पंडित नांवाचे ॥
घ्यावया दर्शन साई बाबाचें । आले एकदांचें शिर्डीत ॥ ४९ ॥
पाऊल ठेवितां शिरडींत । आरंभीं गेले मशिदींत ॥
करुनि बाबांसी प्रणिपात । बैसले निवांत क्षणभरी ॥ ५० ॥
बाबा मग वदती तयातें । जाई दादाभटाच्या येथें ॥
जा असें जा म्हणून बोटें हातें । लविती मार्गातें तयास ॥५१॥

पंडित दादांकडे गेले । दादांनीं योग्य स्वागत केलें ॥
मग दादा बाबांचे पूजेस निघाले। येतां का विचारिलें तयांसी॥५२॥

दादा समवेत पंडीत गेले । दादांनीं बाबांचें पूजन केलें ॥
कोणीही न तोंवर लावाया धजलें । गंधाचें टिकले बाबांस ॥५३॥

कोणी कसाही येवो भक्त। कपाळीं गंध लावूं न देत ॥
मात्र म्हाळसापती गळ्यासीं फांसीत। इतर ते लावीत पायातें॥५४॥

परी हे पंडित भोळे भाविक । दादांची तबकडी केली हस्तक ॥
धरुनियां श्रीसाईचें मस्तक । रेखिला सुरेख त्रिपुंड्र ॥ ५५ ॥

पाहूनि हें तयांचें साहस । दादांचें मनीं धासधूस ॥
चढतील बाबा परम कोपास । काय हें धाडस म्हणावें ॥ ५६ ॥

ऐसें अघडतें जरी घडलें । बाबा एकही न अक्षर वदले ॥
किंबहुना वृत्तीनें प्रसन्न दिसले । मुळीं न कोपले तयांवर ॥५७॥

असो ती वेळ जाऊं दिली । दादाचें मनीं रुखरुख राहिली ॥
मग तेच दोनीं सायंकाळीं । बाबांस विचारिली ती गोष्ट ॥ ५८ ॥

आम्हां गंधाचा उलासा दिला । लावूं जातां अपुलिया निढळा ॥
स्पर्श करूं द्याना कपाळा । आणि हें सकाळा काय घडलें ॥५९॥

अपुल्या टिळ्याचा कंटाळा । पंडितांच्या त्रिपुंड्राचा जिव्हाळा ॥
हा काय नवलाचा सोहळा । बसेना ताळा सुसंगत ॥ ६० ॥

दादा तयाचा गुरू बामण । मी जातीचा मुसलमान ॥
तरी मी तोच ऐसें मानून । केलें गुरुपूजन तयानें ॥ ६१ ॥

ऐसें मज त्याणें फसविलें । तेथं माझें उपाय हरलें ॥
नको म्हणणें जागींच राहिलें । आधीन केलें मज तेणें ॥ ६२ ॥

ऐसें जें हें उत्तर परिसिलें । वाटलें केवळ विनोद भरलें ॥
परि तयांतिल इंगित कळलें । माघारा परतलें जैं दादा ॥ ६३ ॥
ही बाबांची विसंगतता । दादांच्या फारच लागली चित्ता ॥
परी पंडितासवें वार्ता करितां ॥ कळली सुसंगतता तात्काळ ॥६४॥
धोपेश्वरींचें रघुनाथ सिद्ध । काका पुराणिक नामें प्रसिद्ध ॥
पंडित तयांचे पदीं सन्नद्ध । ऋणानुबंध शिष्यत्वें ॥ ६५ ॥
त्यांनीं *काकांचा घातला ठाव । तयांस तैसाच आला अनुभव ॥
जया मनीं जैसा भाव । भक्तीं प्रभावहीं तैसाच ॥ ६६ ॥
असो हे सर्वोपचार करवून घेती । केवळ तयांच्या आलिया चित्तीं ॥
नातरी पूजेचीं ताटें भिरकाविती । रूप प्रकटिती नरसिंह ॥ ६७ ॥
हें रूप का जें प्रगटेल । कोण धीराचा पाशीं ठाकेल ॥
जो तो जीवाभेणें पळेल । वृत्ति खवळेल ती जेव्हां ॥ ६८ ॥
कधीं अवचित क्रोधवृत्ति । भक्तांवरी आग पाखडिती ॥
कधीं मेणाहूनी मऊ भासती । पुतळा शांति क्षमेचा ॥ ६९ ॥
कधीं काळाग्निरूप भासती । भक्तांस खड्गाचे धारेवर धरिती ॥
कधीं लोण्याहूनी मवाळ होती । आनंद वृत्ति विलसती ॥ ७० ॥
जरी क्रोधें कांपलें थरथरा । डोळे जरी फिरविले गरगरां ॥
तरी पोटीं कारुण्याचा झरा । माता लेंकुरा तैसा हा ॥ ७१ ॥
क्षणांत वृत्तीवरी येतां । हांका मारुनी वाहती भक्तां ॥
म्हणती मी कोणावरी ही रागावतां । ठावें न चित्ता माझिया ॥७२॥
माय हाणी लेंकरा लाता । समुद्र करी नदियां परता ॥
तरीच मी होय तुम्हां अव्हेरिता । करीन अहिता तुमचिया ॥७३॥

*काका—धोपेश्वरचे महाराज रघुनाथ यांस काका पुराणिक असें म्हणत.

मी माझिया भक्ताचा अंकिला । आहें पासींच उभा ठाकला ॥
प्रेमाचा मी सदा भुकेला । हाक हाकेला देतसें ॥ ७४ ॥
हा कथा भाग लिहितां लिहितां । ओघानें आठवली समर्पक कथा ॥
उदाहरणार्थ कथितों श्रोतां । सादरचित्ता परिसिजे ॥ ७५ ॥
कल्याणवासी एक यवन । सिद्दीक फाळके नामाभिधान ॥
मक्का मदीना यात्रा करून । शिरडीं लागून पातला ॥ ७६ ॥
उतरला तो वृद्ध हाजी । उत्तराभिमुख चावडी माजी ॥
प्रथम नऊमास इतराजी । बाबा न राजी तयातें ॥ ७७ ॥
आला नाहीं तयाचा होरा । व्यर्थ जाहल्या येरझारा ॥
केल्या तयानें नाना तऱ्हा । नजरानजर होईना ॥ ७८ ॥
मशीद मुक्तद्वार अवघ्यांशीं । कोणासही ना पडदपोशी ॥
परी न आज्ञा त्या फाळक्यासी । चढावयाशीं मशीदीं ॥ ७९ ॥
फाळके अंतरी खिन्न झाले । काय तरी हें कर्म वहिलें ॥
मशीदींस न लागती पाउलें । काय म्यां केलें पाप कीं ॥ ८० ॥
कवण्यायोगें प्रसन्न होती । आतां बाबा मजवर पुढती ॥
हाच विचार दिवसरातीं । हृद्रोग चित्तीं फाळक्यांचे ॥ ८१ ॥
तितक्यांत कोणी कळविलें तयांस । होऊं नका ऐसे उदास ॥
धरा माधवरावांची कास । पुरेल आस मनीची ॥ ८२ ॥
आधीं न घेतां नंदीचें दर्शन । शंकर होईल काय प्रसन्न ॥
तयासीं याच मार्गाचें अवलंबन । गमलें साधन तें बरवें ॥ ८३ ॥

१ शिर्डीत दोन चावडया आहेत एक उत्तराभिमुख व दुसरी दक्षिणाभिमुख. दोनी समोरासमोर आहेत.

सकृद्दर्शनींही अतिशयोक्ती । ऐसें वाटेल श्रोतयां चित्तीं ॥
परी हा अनुभव दर्शनवक्तीं । भक्तांप्रती शिरडींत ॥ ८२ ॥

जया मनीं बाबाचे सवें ॥ संथपणें संभाषण व्हावें ॥
तयाचिया समवेत जावें । माधवरावें आरंभीं ॥ ८३ ॥

आले हे कोण कोठून किमर्थ । गोड शब्दें कळवावा कार्यार्थ ॥
सूतोवाच होतांच समर्थ । होत मग उद्युक्त बोलाया ॥ ८४ ॥

ऐकोनिया तें हाजीनें सकळ । माधवरावांस घातली गळ ॥
म्हणाले एकदांही माझी तळमळ । चालवा दुर्मिळ मिळवुनि द्या ॥८५॥

पडतां माधवरावांस भीड । केला मनाचा निश्चय दृढ ॥
असो वा नसो कार्य अवघड । पाहूंकी दगड टाकुनी ॥ ८६ ॥

गेले मशीदीस केला धीर । गोष्ट काढिली अतिहळुवार ॥
'बाबा तो म्हातारा कष्टी फार । कराना उपकार तयावर' ॥८७॥

'हाजी तो करूनि मक्का मदीना । शिरडीस आला आपुले दर्शना'॥
'तयाची कैसी येईना करूणा । येऊंच द्याना मशीदीं' ॥ ८८ ॥

'जन येती असंख्यात । जाऊन मशीदींत दर्शन घेत' ॥
'हातोहात चालले जात । हाच खिचपत पडला कां' ॥ ८९ ॥

'कराकी एकदां कृपादृष्टी । होवो तयासीं मशीदींत भेटी' ॥
'जाईल मग तोही उठाउठी । पुसूनि गोष्टी मनीची' ॥ ९० ॥

शाम्या तुझा ओठाचा जार । अजून नाहीं वाळला तिळभर ॥
नसतां अल्लाची खुदरत तयावर । मी काय करणार तयास ॥९१॥

नसतां अल्लामियाचा ऋणी । चढेल काय या मशीदीं कुणी ॥
अघटित येथील फकीराची करणी । नाहीं मी धणी तयाचा ॥९२॥

असो " बारवी पलीकडे थेट । आहेजी एक पाऊलवाट ॥
चालून येसील काय तूं नीट" । विचारजा स्पष्ट तयातें ॥ ९३ ॥
हाजी वदे कितीही विकट । असेना ती मी चालेन नीट ॥
परी मज द्यावी प्रत्यक्ष भेट । चरणा निकट बैसूं द्या ॥ ९४ ॥
परिसून शामाकरवीं हें उत्तर । बाबा वदती आणीक विचार ॥
'चारवेळांतीं चाळीस हजार । रुपये तूं देणार काय मज" ॥९५ ॥
माधवराव हा निरोप सांगतां । हाजी म्हणाले हें काय पुसतां ॥
देईन चाळीस लाखही मागतां । हजाराची कथा काय ॥ ९६ ॥
परिसोनि बाबा वदती त्या पूस । "आज बोकड कापावयाचा मानस॥
आहे अमुचा मशीदीस । तुज काय घोसं पाहिजे ॥ ९७ ॥
किंवा पाहिजे तुवंर अस्थी । किंवा वृषणवासना चित्तीं ॥
जा विचार त्या म्हाताऱ्याप्रती । काय निश्चिती वांछीतो" ॥९८॥
माधवरावें समग्र कथिलें । हाजीप्रती बाबा जें वदले ॥
हाजी निक्षून वदते झाले । "नलगे त्यांतले एकही मज ॥ ९९ ॥
" द्यावें मज कांहीं असेल चित्ता । तरी मज आहे एकचि आस्था ॥
कोळंब्यांतील तुकडा लाभतां । कृतकल्याणता पावेन " ॥१००॥
हाजीचा हा निरोप घेऊन । माधवराव आले परतोन ॥
करितांच बाबांस तो निवेदन । बाबा जे तत्क्षण खवळले ॥ १०१॥
कोळंबा आणि पाण्याच्या घागरी । स्वयें उचलून भिरकाविल्या द्वारीं॥
हात चावोनिया करकरी । आले शेजारीं हाजीच्या ॥ १०२ ॥

१ कांहीं अंतरावरील एक विहीर. २ मांस. ३ एका भागाच्या मांसा. सकट अस्थि. ४ भाकर तुकडा ठेवण्याचें मातीचें भांडें.

धरूनि अपुली कफनी दोंकरीं । हाजी सन्मुख उचलूनि वरी ॥
म्हणती तूं काय समजलास अंतरीं । करीसी फुशारी मजपुढें ॥१०३॥
बुढेपणाचा तोरा दाविसी । ऐसेच काय तूं कुराण पढसी ॥
मक्का केल्याचा ताठा वाहसी । परी न जाणसी तूं मातें ॥ १०४॥
ऐसें तयास निर्भर्त्सिलें । अवाच्य शब्दप्रहार केले ॥
हाजी बहु गांगरून गेले । बाबा परतले माघारा ॥ १०५ ॥
मशीदीचे आंगणीं शिरतां । माळिणी देखिल्या अंबे विकितां ॥
खरेदिल्या त्या पाट्या समस्ता । पाठविल्या तत्वता हाजीस ॥१०६॥
तैसेच तात्काळ मागें परतले । पुन्हां त्या फाळक्यापाशीं गेले ॥
रुपये पंचावन्न खिशांतून काढिले । हातावर मोजिले तयाचे ॥१०७॥
तेथून पुढें मग प्रेम जडलें । हाजीस जेवावया निमंत्रिलें ॥
दोघेही जणु अवघे विसरले । हाजी समरसले निजरंगीं ॥ १०८ ॥
पुढें मग ते गेले आले । यथेच्छ बाबांचे प्रेमीं रंगले ॥
नंतरही बाबांनीं वेळोवेळें । रुपये दिधले तयांस ॥ १०९॥
असो एकदां साईसमर्था । मेघावरीही जयाची सत्ता ॥
तया इंद्रासीं पाहिलें प्रार्थितां । आश्चर्य चित्ता दाटलें ॥११०॥
अति भयंकर होता समय । नभ समग्र भरलें तममय ॥
पशु पक्षियां उद्भवलें भय । झंजावाय सूटला ॥ १११ ॥
झाला सूर्यास्त सायंकाळ । उठली एकाएकी वाहुटळ ॥
सुटला वाऱ्याचा सोसाटा प्रबळ । उडाली खळबळ दुर्धर ॥ ११२ ॥
त्यांतची मेघांचा गडगडाट । विद्युल्लतांचा कडकडाट ॥
वाऱ्याचा भयंकर सोसाट । वर्षाव घनदाट जोराचा ॥ ११३॥

मेघ वर्षला मुसळ धारा । वाजूं लागल्या फटफट गारा ॥
ग्रामस्थांस सुटला भेदरा । गुरांढोरां आक्रांत ॥ ११४ ॥
मशीदीच्या वळचणीखालीं । भणंगभिकारी निवाऱ्या आलीं ॥
गुरेंढोरें वांसरें एकत्र मिळालीं । बीड झाली मशीदी ॥ ११५ ॥
पाणीच पाणी चौफेर झालें । गवत सारें वाहून गेलें ॥
पीक ही खळ्यांतील सर्व भिजलें । लोक गजबजले मानसीं॥११६॥
अवघे ग्रामस्थ घाबरले । सभामंडपीं येऊनि भरले ॥
कोणी मशीदीचे वळचणीस राहिले । गाऱ्हाणें घातलें बाबांला॥११७॥
जोगाई जाखाई मरीआई । शनी शंकर अंबाबाई ॥
मारुती खंडोबा म्हाळसाई । ठायीं ठायीं शिरडींत ॥ ११८ ॥
परी अवघड प्रसंग येतां । कामीं पडेना एकही ग्रामस्था ॥
तयांचा तो चालता बोलता धांवता । संकटीं पावता एक साई॥११९॥
नलगे तयास बोकड कोंबडा । नलगे तयास टका दोकडा ॥
एका भावाचा भुकेला रोकडा । करी झाडा संकटांचा ॥ १२० ॥
पाहूनि ऐसें लोक भ्याले ॥ महाराज फारचि हेलावले ॥
गादी सोडुनी पुढें आले ॥ उभे राहिले धारेवर ॥ १२१ ॥
मेघनिनादें भरल्या नभा । कडाडती विजा चमकती प्रभा ॥
त्यांतचि साईमहाराज उभा । आकंठ बोभाय उच्चस्वरें ॥१२२॥
निज जीवाहूनि निजभक्त । देवास आवडती साधुसंत ॥
देव तयांचे बोलांत वर्तत । अवतार घेत त्या लागीं ॥ १२३ ॥
परिसोनि भक्तांचा धांवा । देवास लागे कैवार घ्यावा ॥
वरचेवर शब्द झेलावा । भक्त भावा स्मरोनी ॥ १२४ ॥

१ मशीदीच्या जोत्याच्या कडेवर;

चालली आरोळीवर आरोळी । नाद दुमदुमला निराळीं ॥
वाटे मशीद डळमळी । कांटाळीं बसली सकळांची ॥ १२५ ॥
त्या गिरागजर तारस्वरें । दुमदुमलीं मशीद मंदिरें ॥
तंव मेघ निजगर्जना आवरे । वर्षावथारे धारांचा ॥ १२६ ॥
उदंड बाबांची आरोळी । अवघा सभामंडप डंडळी ॥
गजबजली भक्तमंडळी । तटस्थ ठेली ठायींच ॥ १२७ ॥
अतर्क्य बाबांचें विंदान । जाहलें वर्षावा आकर्षण ॥
वायूही आवरला तत्क्षण । धुई विच्छिन्न जाहली ॥ १२८ ॥
हळू हळू पाऊस उगवला । सोसाटाही मंदावला ॥
नक्षत्रगण दिसूं लागला । तम निरसला ते काळीं ॥ १२९ ॥
पाऊस पुढें पूर्ण उगवला । सोसाट्याचा पवनही विरमला ॥
चंद्र गगनीं दिसूं लागला । आनंद झाला सकळांतें ॥ १३० ॥
वाटे इंद्रास दया आली । पाहिजे संतांची वाणी राखिली ॥
ढगें बारावांटा फांकलीं । शांत झाली वावटळ ॥ १३१ ॥
पाऊस सर्वस्वीं नरमला । वाराही मंद वाहूं लागला ॥
गडगडाट जागींच जिराला । धीर आला पशुपक्षां ॥ १३२ ॥
सोडूनियां घरांच्या वळचणीं । गुरें वासरें बाहेर पडुनी ॥
वावरूं लागलीं निर्भय मनीं । पक्षीही गगनीं उडाले ॥ १३३ ॥
पाहून पूर्वील भयंकर प्रकार । मानूनियां बाबांचे उपकार ॥
जन सर्व गेले घरोघर । गुरेंही सुस्थिर फरकलीं ॥ १३४ ॥
ऐसा हा साई दयेचा पुतळा । तयास भक्तांचा अति जिव्हाळा ॥
लेंकुरां जैसा आईचा कळवळा । किती मी प्रेमळा गाऊं त्या ॥१३५॥

१ कमी झाला; २ फांकली.

अग्नीवरीही ऐसीच सत्ता । ये अर्थींची संक्षिप्त कथा ॥
श्रोतां परिसीजे सादर चित्ता । कळेल अपूर्वता शक्तीची ॥ १३६ ॥
एकदां माध्यान्हीची वेळ । धुनीनें पेट घेतला सबळ ॥
कोण राहील तेथ जवळ । ज्वाला कल्लोळ ऊठला ॥ १३७ ॥
प्रचंड वाढला ज्वाळामाळी । तक्तपोशीला शिखा भिडली ॥
वाटे होते मशीदीची होळी ॥ राख रांगोळी क्षणांत ॥ १३८ ॥
तरी बाबा मनीं स्वस्थ । सकळ लोकचिंताग्रस्त ॥
तोंडात बोटें घालीत समस्त । काय ही शिकस्त बाबांची ॥१३९॥
एक म्हणे आणा कीं पाणी । दुजा म्हणे घालावें कोणी ॥
घालितां माथां सटका हाणी । कोण त्या ठिकाणीं जाईल ॥१४०॥
मनीं जरी सर्व अधीर । विचारावया नाहीं धीर ॥
बाबाच तंव होउनि अस्थिर । सटक्यावर कर टाकियला ॥ १४१ ॥
पाहोनि ज्वाळांचा भडका । हातीं घेऊनियां सटका ॥
हाणिती फटक्यावरी फटका । म्हणती 'हटका माघारा' ॥ १४२ ॥
धूनी पासाव एक हात । स्तंभावरी करिती आघात ।
ज्वाळांकडे पहात पहात । 'सबूर सबूर' वदत ते ॥१४३ ॥
फटक्या फटक्यास खालीं खालीं । ज्वाला नरम पडूं लागली ॥
भीती समूळ उडूनि गेली । शांत झाली ते धुनी ॥ १४४ ॥
तो हा साई संतवर । ईश्वराचा दुजा अवतार ॥
टोई तयाच्या पायावर । ठेवितां कृपाकर ठेवील ॥ १४५ ॥
होउनी श्रद्धा भक्तियुक्त । करील जो या अध्यायाचें नित ॥
पारायण होऊनि स्वस्थचित्त । आपदा निर्मुक्त होईल ॥ १४६ ॥

१ थंड हो. थंड हो.

फार काय करूं मी कथन । शुद्ध करोनीयां अंतःकरण ॥
नेमनिष्ठा व्हा साईपरायण । ब्रह्म सनातन पावाल ॥ १४७ ॥
पुरेल अपूर्व इच्छित काम । व्हाल अंतीं पूर्ण निष्काम ॥
पावाल दुर्लभ सायुज्य धाम । अखंड राम लाधाल ॥१४८ ॥
असो जया भक्तांच्या चित्तीं । भोगावी परमार्थ सुख संवित्ती ॥
तेणें ये अध्यायानुवृत्ती । आदरवृत्ति ठेवावी ॥ १४९ ॥
शुद्ध होईल चित्तवृत्ति । कथा सेवनीं परमार्थ प्रवृत्ति ॥
इष्ट प्राप्ति अनिष्ट निवृत्ति । पहावी प्रचीति बाबांची ॥ १५० ॥
हेमाडपंत साईस शरण । पुढील अध्याय अतिपावन ॥
गुरु शिष्याचें तें महिमान । घोलप दर्शन गुरु पुत्रा ॥ १५१ ॥
शिष्यास कैसाही प्रसंग येवो । तेणें न त्यजावा निज गुरुदेवो ॥
साई तयाचा प्रत्यक्ष अनुभवो । दावी दृढभावो वाढवी ॥ १५२ ॥
जे जे भक्त आले पायीं । प्रत्येका दर्शनाची नवाई ॥
कोणास कांहीं कोणास कांहीं । देऊनि ठायींच दृढ केलें ॥१५३॥
इति श्रीसंत सज्जन प्रेरितें । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थ सच्चरितें । श्रीसाईमहिमावर्णनं नाम एकादशोध्यायः ॥

श्री साईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ॥



# अध्याय १२ वा.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीकुलदैवतायनमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ॥
॥ श्रीसद्‌गुरूसाईनाथायनमः ॥

जय जय सद्गुरू साईनाथा । नमितों चरणीं ठेऊनि माथा ॥
निर्विकारा खंडैक स्वरूपा । करी कृपा शरणागता ॥ १ ॥

सच्चिदानंदा आनंद कंदा । भवदवार्त सौख्यनिष्पंदा ॥
अद्वैत बोधें द्वैत छेदा । मंदाच्याही वारिसी ॥ २ ॥

अवघ्या ठायीं पूर्ण भरलें । गगन जैसें हें विस्तारलें ॥
तेंच की तव स्वरूप रेखाटलें । अनुभवी भले दैवशाली ॥ ३ ॥

साधूंचें व्हावें संरक्षण । असाधूचें समूळ निर्दळण ॥
एतदर्थचि ईश्वरावतरण । संत हे विलक्षण या परते ॥ ४ ॥

साधु असाधु संतां समान । एक मोठा एक ऊन ।
हें जाणेना जयांचें मन । समसमान उभयां जे ॥ ५ ॥

ईश्वराहून संत मोठे । असाधूंस आधीं लाविती वाटे ॥
मन जयांचें तिळतिळ तुटे । प्रेम दाटे दीनार्थ ॥ ६ ॥

भवसागराचे हे अगस्ति । अज्ञान तमाचें हे गभस्ति ॥
परमात्म्याची एथेंच वस्ती । वस्तुतः हे तदभिन्न ॥ ७ ॥

ऐशांतील हा साई माझा । अवतरला भक्तकाजा ॥
मूर्तीमंत ज्ञानराजा । कैवल्यतेजाधिष्टित ॥ ८ ॥

जीव मात्रीं अत्यंत ममता । इतरत्र अत्यंत अनासक्तता ॥
ठायीं सत्ता ठायीं विरक्तता । निर्वैर समता सर्वत्र ॥ ९ ॥

जया न शत्रु मित्रभाव । सरिसे जया रंकराव ॥
ऐसा जो साई महानुभाव । ऐका प्रभाव तयाचा ॥ १० ॥

संत आपुल्या पुण्य कोडी । वेंचिती भक्त प्रेमाच्या ओढीं ॥
न पाहती आड पर्वत दरडी । घालिती उडी भक्तार्थ ॥ ११ ॥

एक अज्ञानीं म्हणून नेणती । परमार्थ काय कशाशीं खाती ॥
स्त्री पुत्र धन कामीं लोलंगिती । विचारीं नेणतीं तीं सोडा ॥ १२ ॥

ऐसीं नेणतीं बाळीं भोळीं । देव तयांतें कृपा कुरवाळी ॥
देवास विमुख देवा निराळीं । अभिमान पोळी तयांतें ॥ १३ ॥

आज्ञानियांची येईल कींव । संत एकादा लावील जीव ॥
विश्वास प्रगटेल लाठीव । ज्ञानाची ताठीव निष्फळ ॥ १४ ॥

पंडितंमन्य मूढ मती । शुष्काभिमानें उगीच फुगती ॥
भक्तिपंथ अवहेळिती । नको संगती तयांची ॥ १५ ॥

नको वर्णसंकर वंड । नको वर्णाभिमान थोतांड ॥
न व्हा वर्णाश्रम धर्मलंड ॥ पाखंड पंडित न व्हावें ॥ १६ ॥

वेद वेदांग पारंगत ॥ ज्ञानगर्वें मदोन्मत्त ॥
भक्ति मार्गाचे आड येत । तयांची धडगत दिसेना ॥ १७ ॥

अज्ञानी विश्वास पडिपाडें । तरेल तो भवभय सांकडें ॥
परी या शास्त्र पंडितांचें कोडें । कदां नुलगडे कवणातें ॥ १८ ॥

संतापायीं ठेविनां विश्वास । अज्ञानिया अज्ञान निरास ॥
ज्ञानाभिमानियां न विकल्प सायास । उपजेल तयांस सद्भाव॥१९॥

असो एकदां सुदैव परिपाटी। कैसी घडली विचित्र गोष्टी ॥
होती एका कर्मठाचे ललाटीं। अलभ्य भेटी साईची ॥ २० ॥

तयाचा संकल्प होता वेगळा। योगायोग होता निराळा ॥
तेणेंच शिरडीचा लाभ घडला। दृष्टीस पडला निजगुरू ॥ २१ ॥

तें अति सुरस कथानक। जें गुरुमहात्म्य प्रकाशक ॥
श्रवण कराजी आवश्यक। प्रेम निदर्शक गुरुभक्तां ॥ २२ ॥

नाशिक क्षेत्रस्थ कर्मठ सोंवळे। अग्निहोत्री उपनाम मुळे ॥
पूर्व पुण्याईच्या बळें। शिरडीस आले एकदां ॥ २३ ॥

गांठीं नसतां हें बळ। शिरडीस कोणीही ठरेना पळ ॥
कोणाचा कितीही निश्चय प्रबळ। न चले चळवळ बाबांपुढें॥२४॥

कोणी म्हणेल मी जाईन। मनमाने तों तेथें राहीन ॥
नाहीं तयाच्या हें आधीन। पराधीन तो सर्वस्वीं ॥ २५ ॥

ऐसें मी मी म्हणतां। थकलें कित्येक निश्चय करितां ॥
साई एक स्वातंत्र्य देवता। गळे अहंता इतरांची ॥ २६ ॥

अपुली पाळी आलियावीण। बाबांस होईना अपुलें स्मरण ॥
कानीं न येई तद्गुणवर्णन। दर्शन स्फुरण कोठून ॥ २७ ॥

जावें साई समर्थ दर्शना। असतां कित्येकांचीं कामना ॥
योगचि आला नाहीं त्यांना। साई निर्वाणापर्यंत ॥ २८ ॥

पुढें जाऊं जाऊं म्हणतां। आड येऊन दीर्घसूत्रता ॥
राहिले कित्येक येतां येतां। बाबाही निधनता पावले ॥ २९ ॥

आज उद्यां करित राहिले। अखेर प्रत्यक्ष भेटीस अंतरले ॥
ऐसे पश्चात्ताप पावले। अंतीं नागवले दर्शना ॥ ३० ॥

ऐसियांची जी राहिली भूक। परिसतां कथा या आदर पूर्वक ॥
पुरवील दुधाची तहान ताक। विश्वास एक ठेवितां ॥ ३१ ॥
बरें जे भाग्यें कोणी गेले। दर्शन स्पर्शनें चित्तीं धाले ॥
ते काय तेथें यथेच्छ राहिले। बाबांनीं ठेविलें पाहिजे ॥ ३२ ॥
अपुल्यापायीं कोणा न जाववे। राहूं म्हणतां कोणा न राहवे ॥
आज्ञा होई तोंच बसावें। माघारा जावें जा म्हणतां ॥ ३३ ॥
एकदा काका महाजनी। शिरडीस गेले मुंबईहूनी ॥
एक आठवडा शिरडीस राहुनी। परतावें मनीं तयांचें ॥ ३४ ॥
बावडी सुंदर शृंगारीत। बाबांसमोर पाळणा टांगीत ॥
कृष्णजन्माचा उत्सव करीत। आनंदें नाचत भक्तजन ॥ ३५ ॥
गोकुळ अष्टमीचाही सोहळा। आनंदानें पहावा डोळां ॥
साधूनि ऐसी मौजेची वेळा। काका शिर्डीला पातले ॥ ३६ ॥
आरंभींच बाबांच्या दर्शना। जातां बाबा पुसती तयांना ॥
"परतणार केव्हां निज सदना"। विस्मित मना तें काका ॥ ३७ ॥
भेटतां क्षणींच हा कां प्रश्न। काका जाहले विस्मयापन्न ॥
राहूं शिरडींत आठ दिन। होतें कीं मन तयांचें ॥ ३८ ॥
बाबाच जेव्हां स्वयें पुसती। उत्तर देणें काकाप्रती ॥
तेंही वाटे बाबाच सुचविती। म्हणून देती योग्यतें ॥ ३९ ॥
"बाबा जेव्हां देतील आज्ञा। परतेन तेव्हां अपुले सदना" ॥
प्रत्युत्तर येतांच काकांच्या वदना। 'उदयीक जा ना' म्हणाले ॥ ४० ॥
आज्ञा केली शिरसा प्रमाण। करून बाबांसीं अभिवंदन ॥
असतां अष्टमीसारखा सण। केलें प्रयाण तेच दिनीं ॥ ४१ ॥

पुढें जंव ते गांवीं येती । पेढी वरती जाऊन पाहती ॥
मालक मार्ग प्रतीक्षाच करिती । काका परतती केव्हां ही ॥ ४२ ॥
मुनीम एकाएकी अजारी ॥ मालकास काकांची जरूरी ॥
काकांनीं त्वरित यावें माघारीं । पत्र शिरडीवरी मोकलीलें ॥ ४३ ॥
काका तेथून निघाल्यावरी । टपालवाला तपास करी ॥
मग तें पत्र पाठवी माघारी । मिळालें घरीं काकांस ॥ ४४ ॥
तेच पहा कीं याचे उलट । श्रवण करा ही अल्प गोष्ट ॥
भक्तांस न कळे निजाभीष्ट । साई तें स्पष्ट जाणतसे ॥ ४५ ॥
एकदां नाशिकचे प्रख्यात वकील । नामें भाऊसाहेब धुमाळ ॥
बाबांचे एक भक्त प्रेमळ । आले केवळ दर्शना ॥ ४६ ॥
उभ्या उभ्या घ्यावें दर्शन । करूनिया पायीं नमन ॥
घेऊनि उदी आशिर्वचन । जावें परतोन हें पोटीं ॥ ४७ ॥
परततां वाटेवर निफाडास । उतरणें होतें धुमाळांस ॥
तेथें एका मुकदम्यास । जाणें तयांस आवश्यक ॥ ४८ ॥
हा जरी तयांचा बेत । बाबा जाणत उचितानुचित ॥
परत जावया आज्ञा मागत । बाबा न देत ती त्यांनां ॥ ४९ ॥
आठवडा एक ठेवून घेतलें । आज्ञा देण्याचें स्पष्ट नाकारिलें ॥
सुनावणीचें कार्य लांबलें । तैसेच गेले तीन वार ॥ ५० ॥
आठवड्यावरही कांहीं दिवस । ठेवून घेतलें धुमाळांस ॥
इकडे मुकदम्याचे तारखेस । न्यायाधीशास अस्वस्थता ॥ ५१ ॥
जन्मांत कधींहि नाहीं ठावा । ऐसा पोटशूळ दुर्धर उठावा ॥
मुकदमा आपाप पुढें ढकलावा । काळ लागावा सार्थकीं ॥ ५२ ॥

१ नेमलेल्या तीन तारिखा.

असो धुमाळांस साईसहवास। पक्षकाराचा चिंता निरास ॥
घडून आलें अप्रयास। ठेवितां विश्वास साईवर ॥ ५३ ॥

पुढें मग योग्य कालीं। धुमाळातें आज्ञा दिधली ॥
कार्यें सर्व यथास्थित झालीं। अघटित केली सांईची ॥ ५४ ॥

मुकदमा चालला चार मास। जाहले चार न्यायाधीश ॥
परी अखेरीस आलें यश। आरोपी निर्दोष सूटला ॥ ५५ ॥

एकदां एक भक्तप्रवर। नानासाहेब निमोणकर ॥
कैसा तयांच्या पत्नीचा कैवार। घेतला तो प्रकार परिसावा ॥५६॥

निमोण गांवींचे वतनदार। न्यायाधीशाचा कारभार ॥
सोंपवी जया सरकार। वजनदार हे मोठे ॥ ५७ ॥

माधवरावांचे पितृव्य ज्येष्ठ। वयोवृद्ध पूज्य श्रेष्ठ ॥
जायाही मोठी एकनिष्ठ। साईच इष्ट दैवत ज्यां ॥ ५८ ॥

सोडूनियां वतनी गांव। शिरडींत दोघांही दिधला ठाव ॥
साईचरणीं ठेवूनि भाव। सुख स्वभाव वर्तती ॥ ५९ ॥

उठूनिया ब्राह्म मुहूर्तीं। प्रातःस्नान पूजन सारिती ॥
कराया नित्य काकड आरती। चावडीप्रती तीं येत ॥ ६० ॥

पुढें अपुलीं स्तोत्रें म्हणत ॥ नाना बाबांपाशींच राहत ॥
होई सूर्यास्त तों पर्यंत। सेवेंत निरत बाबांच्या ॥ ६१ ॥

लेंडीवरी बाबांस नेत। मशीदींत आणून घालित ॥
पडेल ती ती सेवा करीत। प्रेमभरीत मानसें ॥ ६२ ॥

---

१ हा मुकदमा एकाकडून दुसऱ्याकडे असा चालतां चालता चार माजिस्ट्रेटांकडे वर्ग होत गेला.

बाईनेंही अपुल्या परी । करवेल ती बाबांची चाकरी ॥
करावी अति प्रेमभरी । दिवसभरी तेथेंच ॥ ६३ ॥

मात्र कराया स्नान पान । स्वयंपाक जेवण खाण ॥
अथवा रात्रीं कराया शयन । निजस्थान सेवावें ॥ ६४ ॥

बाकी अवशेष सर्वकाळ ॥ दुपारतिपार सांज सकाळ ॥
घालवी हें दंपत्य प्रेमळ । राहूनि जवळ बाबांच्या ॥ ६५ ॥

असो या दोघांची सेवा वर्णिता । होईल बहु ग्रंथ विस्तारता ॥
म्हणून प्रस्तुत विषयापुरता । भाग मी आतां ऐकवितों ॥६६॥

बाईस जाणें बेळापुरीं । मुलगा तेथें थोडा अजारी ॥
केली पतीच्या विचारीं । तेथें तयारी जाण्याची ॥ ६७ ॥

पुढें नित्यक्रमानुसार । बाबांचाही घेतला विचार ॥
पडतांच बाबांचा होकार । घातला कानावर पतीच्या ॥ ६८ ॥

असो ऐसें निश्चितपणें । ठरलें बेलापुरचें जाणें ॥
पुढें पडलें नानाचें म्हणणें । उद्यांच परतणें माघारा ॥ ६९ ॥

नानास होतें कांहीं कारण । म्हणून म्हणती तिजलागून ॥
जा परी ये परतोन । दुश्चित मन कुटुंब ॥ ७० ॥

दुसरे दिवशीं पोळ्याची अवस । तोही तेथेंच काढावा दिवस ॥
होती बाईच्या मनाची हौस । येईना मनास नानांच्या ॥ ७१ ॥

शिवाय अमावास्येचा दिन । अनुक्त कराया गमनागमन ॥
बाईस पडलें कोडें गहन । कैसी सोडवण होईल ॥ ७२ ॥

बेलापुरास गेल्यावीण । वाटे न तिजला समाधान ॥
दुखवितां नये पतीचें मन । आज्ञोल्लंघन मग कैचें ॥ ७३ ॥

असो मग केली तयारी । निघाली जावया बेलापुरीं ॥
लेंडीस निघाली बाबांची स्वारी । नमस्कारी तयांतें ॥ ७४ ॥

कोणीही बाहेर गावीं जातां । पावावया निर्विघ्नता ॥
देवापुढे खाळवी माथा । तोच कीं प्रथा शिर्डींत ॥ ७५ ॥

परी तेथींचा देव साई । जावयाची कितीही घाई ॥
निघावयाचे समयीं डोई । तयाचे पायीं ठेवीत ॥७६॥

या तेथील क्रमानुसार । साठ्यांचिया वाड्यासमोर ॥
बाबा उभे असतां क्षणभर । बाईनें चरण वंदिले ॥ ७७॥

नानासाहेब निमोणकर । आदीकरून सान थोर ॥
येऊन तेथें दर्शन तत्पर । नमस्कारीत बाबांना ॥ ७८ ॥

ऐसिया समस्त मंडळी देखता । विशेषतः नानाचिया समक्षता
बाबा जें वदले बाईस तत्वतां । पहावी समयोचितता तयाची ॥७९॥

पायीं ठेवूनियां माथा । निघावयाची आज्ञा मागतां ॥
' जा वरें लवकर जा आतां । स्वस्थ चित्त असावें ' ॥ ८० ॥

' गेल्यासारखे चार दिवस । सुखीं राही बेलापुरास ' ॥
' विचारूनिया सर्वत्रांस । माघारा शिर्डीस येईं तूं ' ॥८१॥

असो बाबांचें वचन । बाईस अकल्पित शांतवन ॥
निमोणकरांस पटली खूण । समाधान उभयतां ॥ ८२ ॥

सारांश आपण करावें वेत । आह्मां न जाणवे आदी अंत ॥
हिताहित जाणती संत । काहीं न अविदित तयांतें ॥ ८३ ॥

भूत भविष्य वर्तमान । करतलामलकवत् तयां ज्ञान ॥
करितां तयांच्या आज्ञेंत वर्तन । सुखसंपन्न भक्त होती ॥ ८४ ॥

असो आतां पूर्वानुसंधान । चालवूं मुख्यकथा निरूपण ॥
कैसी मुळ्यांवरी कृपा करून । दिधलें दर्शन गुरूचें ॥ ८५ ॥
श्रीमंत बापूसाहेब बुट्टी । हेतू घ्यावी तयांची भेटी
परतोनी जावें उठाउठी । मुळ्यांच्या पोटीं हें होतें ॥ ८६ ॥
असो हा जरीं त्यांचा हेत । बाबांचा त्यांत अन्य संकेत ॥
तो चमत्कार तें इंगित । सावचित्त परिसावें ॥ ८७ ॥
श्रीमंतांची भेट झाली । मंडळी मशिदीलागी निघाली ॥
मुळ्यांनाहीं इच्छा उदेली । निघाले मंडळी समवेत ॥ ८८ ॥
मुळे षट्शास्त्रीं अध्ययन । ज्योतिर्विद्येंत अति प्रवीण ॥
सामुद्रिकांतही तैसेच पूर्ण । रमले दर्शन होतांच ॥ ८९ ॥
पेढे बतासे बर्फी नारळ । नारिंगादी फळफळावळ ॥
अमूप अर्पिती जन प्रांजळ । भक्त प्रेमळ बाबांस ॥ ९० ॥
शिवाय तेथें येती माळिणी । जांब केळी ऊस घेऊनी ॥
बाबा खरिदिती आलिया मनीं । पैसे देउनीं पदरचे ॥ ९१ ॥
पल्लवचा पैका खर्च करीत । अंब्याच्या पाट्या खरेदीत ॥
केळींही उमाप आणवीत । वाटीत मनसोक्त भक्तांनां ॥ ९२ ॥
एकेक आंबा घेऊन करीं । धरून दोहीं तळ हस्ताभ्यंतरीं ॥
चोळून मऊ झालियावरी । भक्तां करीं मग देत ॥ ९३ ॥
आंबा लावितां ओठीं । रस एकदाच उतरावा पोटीं ॥
जैसी भरली रसाची वाटी । साल बाठी फेंकावी ॥ ९४ ॥
केळ्यांची तो अपूर्व शैली । भक्तांनी घ्यावी गर्भनव्हाळी ॥
बाबांनीं सेवाव्यांत तयांच्या साली । काय त्या केली अद्भूत॥९५॥

हीं सर्व फळें आपुले हातीं । बाबा तेथें अवघ्यांस वांटिती ॥
कोण्हालीं आलिया चित्तीं । स्वयें चाखिती एकादें ॥ ९६ ॥
या क्रमाचिया परिपाटी । केवळ भक्तजनाचिया साठीं ॥
खरीदूनी केळियांची पाटी । बाबा वाटीत होतें तें ॥ ९७ ॥
शास्त्रीबुवांस आश्चर्य गहन । जाहलें देखूनी बाबांचे चरण ॥
ध्वज वज्रांकुश रेखा निरीक्षण । करावें मन जाहलें ॥ ९८ ॥
भक्त काकासाहेब दीक्षित । होते तेव्हां निकट स्थित ॥
उचलूनि चार रंभा फळें देत । बाबांचे हातांत तेधवां ॥ ९९ ॥
कोणी बाबांस बहु विनविलें । बाबा हे क्षेत्रस्थ शास्त्री मुळे ॥
पातले चरणीं पुण्यबळें । प्रसाद फळें द्या कीं यां ॥ १०० ॥
विनवा कोणी वा न विनवा । बाबांचे आलियावीण जीवा ॥
कोणातें कांहीं न देती ते केव्हां । करिती तेव्हां दाय तें ॥ १०१ ॥
केळीं न, मुळे हात मागती । तदर्थ पुढें हात पसरिती ॥
बाबा न तिकडे चित्त देती । प्रसाद वाटिती सकळिकां ॥ १०२ ॥
मुळे बाबांस करिती विनंती । फळें नको हात द्या मागती ॥
पाहूं येतें सामुद्रिक वदती । बाबा न देती त्यां हात ॥ १०३ ॥
तरी ही मुळे पुढें सरकत । सामुद्रिकार्थ हात लांबवित ॥
बाबा न तिकडे ढुंकून पहात । जणूं नाहींत गांवींचे त्या ॥ १०४ ॥
पसरिल्या मुळ्यांचे हातीं । बाबा तीं चार केळीं ठेविती ॥
बसा म्हणती परी न देती । मुळ्यांचे हातीं निजहस्त ॥ १०५ ॥
आजन्म ईश्वरार्थ झिजविला काय । तयास सामुद्रिकीं कर्तव्य काय ॥
अवाप्त सकळ काम साईराय । सद्भक्तां माय बाप जो ॥ १०६ ॥
पाहूनि बाबांची निस्पृह स्थिती । सामुद्रिकार्थ उदासीनवृत्ती ॥
शास्त्रीबुवा हस्त आंवरिती । नाद टाकिनी बाबांचा ॥ १०७ ॥

कांहीं वेळ स्वस्थ बैसले । मंडळी समवेत वाड्यांत गेले ॥
स्नान केलें सोंवळें ल्याले । आरंभू सरले अग्निहोत्र ॥१०८ ॥
इकडे नित्यक्रमानुसार । बाबा निघाले लेंडीवर ॥
म्हणती गेरू घ्यारे बरोबर । भगवें अंबर परिधानू ॥ १०९ ॥
सर्वांस वाटला चमत्कार । गेरूनें बाबा काय करणार ॥
जो तो करूं लागे विचार । गेरू स्मरला आजकां ॥ ११० ॥
बाबांची अशीच संदिग्ध वाणी । काय अर्थ जाणावा कोणी ॥
परी आदरें साठविल्या श्रवणीं । अर्थ श्रेणी योगरिती ॥ १११ ॥
कीं ते संतांचे बोल । कधींही जे नसणार फोल ॥
अर्थभरित सदा सखोल । करवेल मोल कवणातें ॥ ११२ ॥
आधीं विचार मग उच्चार । हा तो नित्याचा व्यवहार ॥
उच्चारापाठीं आचार । संत साचार आदरिती ॥ ११३ ॥
या सर्वमान्य सिद्धांतानुसार । संतवचन कधीं न निःसार ॥
ध्यानीं धरूनि पडताळितां फार । पडे वेळेवर उकल त्या॥११४॥
असो इकडे बाबा परतले । निशाणी शिंग वाजूं लागलें ॥
बापूसाहेब जोगीं वहिलें । वेळीं सुचविलें मुळयांतें ॥ ११५ ॥
आरतीचा समय आला । येतां काय कीं मशीदीला ॥
शास्त्रीबुवांचे सोंवळेंपणाला । प्रसंग वाटला अवघड तो ॥११६॥
वदती मग ते प्रत्युत्तरीं । घेऊं दर्शन तिसरे प्रहरीं ॥
लागले जोग मग ते अवसरीं । करूं तयारी आरतीची ॥ ११७॥
इकडे बाबा परत येवोनी । बसले बोलत जों निजासनीं ॥
तों सर्वांच्या पूजा होऊनी । आरती स्थानीं थाटली ॥ ११८ ॥
इतुक्यांत बाबा म्हणतीं आणा । त्या नव्या बामणाकडून दक्षिणा ॥
बापूसाहेब उठीच तत्क्षणां । गेले दक्षिणा मागावया ॥ ११९ ॥

तुकतेच मुळे करूनि स्नान । सोवळें वस्त्र करूनि परिधान ॥
बसले होते घालूनि आसन । स्वस्थ मन करूनियां ॥ १२० ॥
निरोप परिसतां ते अवसरीं । विक्षेप दाटला मुळ्यांचे अंतरीं ॥
दक्षिणा किमर्थ म्या द्यावी तरीं । मी अग्निहोत्री निर्मळ ॥१२१॥
असतील बाबा मोठे संत । परि मी काय तयांचा अंकित ॥
मजपाशीं कां दक्षिणा मागत । जाहले दुश्चित्त मत तेणें ॥ १२२ ॥
साईसारिखे दक्षिणा याचिती । कोट्याधीश निरोप आणिती ॥
मुळे जरीं मनीं शंकती । दक्षिणा घेती समवेत ॥ १२३ ॥
आणीक संशय तयांचे मनीं । आरब्ध कर्म अपूर्ण टाकुनी ॥
जावें केवी मशिदीलागुनी । नाहीं म्हणूनही म्हणवेना ॥ १२४ ॥
संशयात्म्यास नाहीं निश्चिती । सदां दोलायमान चित्तीं ॥
तयां न ही नाती गतो ।.त्रिशंकु स्थिती तयाची ॥ १२५ ॥
तथापि मग केला विचार । जावयाचा केला निर्धार ॥
गेले सभामंडपाभीतर । राहिले दूर ते उभे ॥ १२६ ॥
आपण सोवळे मसीद ओवळी । जावें कैसें बाबा जवळीं ॥
लांब राहूनी बद्धांजळी । पुष्पांजळी फेकिती ॥ १२७ ॥
इतुक्यांत ऐसा चमत्कार । झाला तयांचे दृष्टीसमोर ॥
बाबा अदृश्य गादीवर । घोलप गुरूवर दिसले तें ॥ १२८ ॥
इतरांस नित्याचे साईसमर्थ । मुळयांचे डोळां घोलपनाथ ॥
ते जरी पूर्वीच ब्रम्हीभूत । आश्चर्यचकित बहु मुळे ॥ १२९ ॥
गुरू जरीं वस्तुतः समाधिस्त । तेही जैं दृष्टीगोचर भासत ॥
तेणें मुळे अति विस्मित । तैसेच साशंकित मानसीं ॥ १३० ॥
स्वप्न म्हणावें नाहीं निजेला । जागृति तरी गुरू कैसा टेला ॥
संभ्रम केउता जीवीं उठला । बोल खुंटला क्षणभरीं ॥ १३१ ॥

आपुला आपण घेई चिमटा । म्हणे नव्हे हा प्रकार खोटा ॥
किमर्थ मना हा संशय फुकटा । सर्वां सकटां मी येथें ॥ १३२ ॥
पुळे मुळचे घोलपभक्त । बाबाविषयीं जरीं शंकित ॥
परी झाले पुढें अंकित । अकलंकित मानसें ॥ १३३ ॥
स्वयें वर्णाग्रज ब्राह्मण । वेद वेदांग शास्त्र संपन्न ॥
मशीदींत घोलप दर्शन । विस्मयापन्न जाहले ॥ १३४ ॥
मग वरती गेले चढोन । निजगुरूचे चरण वंदून ॥
उभे राहिले कर जोडून । वाचेसीं मौन पडियेलें ॥ १३५ ॥
भगवीं वस्त्रें भगवी छाटी । घोलपस्वामी देखोनि दृष्टी ॥
धांवोनी पायीं घातली मिठी । उठाउठीं मुळ्यांनीं ॥ १३६ ॥
तुटला उच्च वर्णाभिमान । पडले डोळियांमाजी अंजन ॥
भेटतां निजगुरू निरंजन । निधान संपन्न ते झाले ॥ १३७ ॥
हरपली विकल्पवृत्ती । जडली बाबांवरी प्रीती ॥
अर्धोन्मीलित नेत्रपातीं । टक लाविती साई पदीं ॥ १३८ ॥
अनंत जन्मींचें सुकृत फळलें । दृष्टी पडलीं साईची पाउलें ॥
चरण तीर्थीं स्नान घडलें । दैव उघडलें वाटलें ॥ १३९ ॥
आश्चर्य केलें सकळिकीं । हें काय घडलें एकाएकीं ॥
जाऊनी फुलांची फेंकाफेंकी । पायीं डोकी ठेविती कां ॥१४०॥
इतर म्हणती बाबांची आरती । मुळे घोलप नामें गर्जती ॥
उंचस्वरें त्यांचीच आरती गाती । रंगी रंगती सप्रेम ॥ १४१ ॥
सोंवळ्याची सांडिली स्फीती । स्पर्शास्पर्शाची विराली स्फूर्ती ॥
साष्टांग दंडायमान होती । डोळे मिटिती आनंदें ॥ १४२ ॥
उठल्यावरीं डोळे उघडितां । घोलप स्वामीशीं अदृश्यता ॥
त्यांचे स्थानीं साई समर्था । दक्षिणा मागतां देखिलें ॥ १४३ ॥

पाहोनी बाबांची आनंदमूर्ति । आणि तयांची ती अतर्क्यशक्ती ॥
तटस्थ झाली चित्तवृत्ती । मुळे निज स्थिती विसरले ॥ १४४ ॥
ऐसें हें महाराजांचें कौतुक । देखतां हरली तहान भूक ॥
जहालें निजगुरू दर्शनसुख । परमहरिख मुळ्यांनां ॥ १४५ ॥
जाहलें मानसीं समाधान । घातलें बाबांस लोटांगण ॥
आनंदाश्रूंस भरतें येऊन । मस्तकीं चरण वंदिले ॥ १४६ ॥
दक्षिणा काय होती ती दिधली । पुनश्च डोई चरणीं ठेविली ॥
नयनीं प्रेमाचीं आसुवें आलीं । तनु झाली रोमांचित ॥ १४७ ॥
सद्गदीत कंठ झाला । अष्टभाव मनीं दाटला ॥
म्हणती मनीचा संशय फिटला । वरी भेटला निजगुरू ॥ १४८ ॥
पाहोनि बाबांची अलौकिक लीळा । मुळ्यांसह सर्व जन गहींवरला॥
गेरूचा अर्थ निशद झाला । अनुभव आला तेधवां ॥ १४९ ॥
हेच महाराज हेच मुळे । आश्चर्य कैसें येच वेळे ॥
कोण जाणे महाराजांचे कळे । अगाध लीले तयांचे ॥ १५० ॥
ऐसेच एक मामलतदार । धरूनि साई दर्शनीं आदर ॥
सवें घेऊन मित्र डॉक्टर । निघाले शिरडीस यावया ॥ १५१ ॥
डॉक्टर ज्ञातीनें ब्राह्मण । रामोपासक आचारवान ॥
स्नान संध्या विहिताचरण । नेम निर्बंधन आवड ॥ १५२ ॥
साईबाबा मुसलमान । आपुलं आराध्य जानकीजीवन ॥
आधींच स्नेह्यास ठेविलें सांगुन । नाहीं मी नमन करणार ॥१५३॥
मुसलमानाच्या पायीं नमन । करावया हें घेईना मन ॥
म्हणून शिरडीस करावया गमन । प्रथमपासून शंकित मी ॥१५४
"पाया पडा" हा कोणीही आग्रह । धरणार नाहीं ऐसा दुराग्रह ॥
करून घेऊं नका हा ग्रह । करा हा निग्रह मनाचा ॥ १५५ ॥

" करावा मातें नमस्कार " । बाबाही न कधीं वदणार ॥
आश्वासितां हें मामलतदार । प्रकटला आदर गमनार्थी ॥ १५६ ॥
ऐसा दृढनिश्चय करून । मानूनि आपुले मित्राचें वचन ॥
विकल्प अवघा दूर सारून । निघाले दर्शन घ्यावया ॥ १५७ ॥
परी आश्चर्य जें शिरडीस आले । दर्शनार्थ मशिदीस गेले ॥
आरंभीं त्यांनींच लोटांगण घातलें । विस्मीत झाले बहु स्नेही॥१५८॥
तंव ते पुसती तयांतें । कैसे विसरलां कृत निश्चयातें ॥
आम्हां आधींच लोटांगणातें । मुसलमानातें घातलें कैसें ॥ १५९॥
मग ते डॉक्टर कथिती नवल । रामरूप म्यां देखिलें श्यामल ॥
तें मी तात्काळ वंदिलें निर्मल । सुंदर कोमल साजिरें ॥ १६० ॥
तेंच पहा हें आसनस्थित । तेंच हें सर्वांसवें बोलत ॥
म्हणतां म्हणतां क्षणार्धांत । दिसूं लागत साईरूप ॥ १६१ ॥
तेणें डॉक्टर विस्मयापन्न । म्हणावें तरी हें काय स्वप्न ॥
म्हणे हे कैंचे मुसलमान । योगसंपन्न अवतारी ॥ १६२ ॥
चोखामेळा जातीचा महार । रोहिदास हा तो चांभार ॥
सजन कसाई हिंसा करणार । जातीचा विचार काय यांच्या॥१६३॥
केवळ जगाचीया उपकारा । चुकवावया जन्ममरणाचा फेरा ॥
त्यागूनि निर्गुणा निराकारा । आले हे आकारा संत जगीं ॥१६४॥
हा तो प्रत्यक्ष कल्पद्रुम । क्षणांत साई क्षणांत राम ॥
माझा दंडिला अहंभ्रम । दंडप्रणाम करवूनी ॥ १६५ ॥
दुसरे दिवशीं घेतलें व्रत । कृपा न करितां साईनाथ ॥
पाऊल न ठेवणें मशीदींत । बैसले उपोषित शिरडींत ॥ १६६ ॥
ऐसे क्रमिले दिवस तीन । पुढे उगवतां चौथा दिन ॥
काय घडलें वर्तमान । दत्तावधान परिसा तें ॥ १६७ ॥

वास्तव्य ज्याचें खानदेशांत । ऐसा एक अकस्मात ॥
स्नेही तयांचा पातला तेथ । दर्शनार्थ साईच्या ॥ १६८ ॥
नऊ वर्षांनीं जाहली भेटी । परमानंद माईना पोटीं ॥
डॉक्टरही गेले उठाउठीं । तयाचें पाठीं मशीदीस ॥ १६९ ॥
जातांच घातला नमस्कार । बाबा पुसती कां डॉक्टर ॥
कोणी आला का बोलाविणार । आलास कां उत्तर देई मज॥१७०
ऐकून ऐसा वर्मी प्रश्न । डॉक्टर गेले विरघळून ॥
जाहलें कृतनिश्चयाचें स्मरण । अनुताप खिन्न अंतरीं ॥ १७१ ॥
परी ते दिवशीं मध्यरात्रीं । कृपा जाहली तयावरीं ॥
परमानंद स्थितीची माधुरी । निद्रे माझारी चाखिली ॥ १७२ ॥
पुढें डॉक्टर स्वग्रामा परतती । तरीं ती संपूर्णस्वानंद स्थिती ॥
संपूर्ण पंधरा दिन अनुभविती । वाढली भक्ति साईपदीं ॥ १७३ ॥
ऐसेंच साईचें अनेक अनुभव । सांगू येतील एकेक अभिनव ॥
वाढेल बहुत ग्रंथ गौरव । विस्तारभयास्तव आंवरितों ॥ १७४ ॥
आरंभींची मुळ्यांची कथा । परिसतां विस्मय श्रोतियां चित्ता ॥
परी येथील तात्पर्यार्थता । तैसीच बोधकता आकळिजे ॥ १७५ ॥
जो जो जयाचा गुरु असावा । त्याचेच ठायीं दृढ विश्वास बसावा ॥
अन्यत्र कोठेंही तो नसावा । मनीं ठसावा गुह्यार्थ हा ॥ १७६ ॥
यांहून अन्य कांहीं हेतू । दिसेना या बाबांचे लीले आंतू ॥
कोणी कसाही विचारवंतू । असो परंतु अर्थ हाची ॥ १७७ ॥
कोणाची कीर्ती कितीही असो । आपुले गुरुची मुळींही नसो ॥
परि आपुलेच ठायीं विश्वास वसो । हाचि उपदेशो येथिला ॥१७८॥
पोथी पुराण धुंडूं जातां । हाच उपदेश भरला तत्वतां ॥
परी ऐसी खूण गांठ न पडतां । निष्ठा वठतां वठेना ॥ १७९ ॥

नसोनि आत्मनिश्चय वरिष्ठ । मिरविती आपण आत्मनिष्ट ॥
त्यांच्या जन्माचे अवघे कष्ट । दिसती स्पष्ट ठायीं ठायीं ॥ १८० ॥
इदंच नास्ती परंचना । आजन्म सदैव विवंचना ॥
स्थैर्य लभेना क्षणैक मना । मुक्ताच्या वल्गना करिताती ॥१८१॥
असो पुढील अध्यायाची गोडी । याहून आढळेल चोखडी ॥
केवळ साईदर्शन परवडी । आनंद निखर्टी भोगवी ॥ १८२ ॥
भक्त भीमाजी पाटील ऐसा । क्षयरोग तयाचा घालविला फांसा ॥
भक्त चांदोरकरांचा भरंवसा । दृष्टांता सरिसा पटविला ॥ १८३ ॥
ऐसा केवळ दर्शन प्रताप । ऐहिकांचें लावी माप ॥
आमुष्मिक ही देई उमाप । दर्शनें निष्पाप करी जो ॥१८४ ॥
करी जें योगियाचा दृष्टिपात । नास्तिकांसही पाप निर्मुक्त ॥
आस्तिकांची तें काय मात । पाप परिच्युत सहजेंच ॥ १८५ ॥
तत्वीं जयाची बुद्धी स्थिर । झाला जया अपरोक्ष साक्षात्कार ॥
जो होय तयाचे दृष्टीगोचर । पाप दुस्तर तरला तो ॥ १८६ ॥
ऐसी बाबांची कळा अकळ । बाबा तुम्हालागीं प्रेमळ ॥
म्हणोनि जाणते नेणते सकळ । होऊनि निर्मळ श्रवण करा॥१८७॥
जेथें भक्तिप्रेमाचा जिव्हाळा । जेथें भीवास बाबांचा लळा
तेथेंच प्रकटे खरा कळवळा । श्रवणाचा सोहळा तेथेंच ॥ १८८ ॥
हेमाड नमितो साईचरणां । वज्रपंजर जे अनन्य शरणां ॥
पार नाहीं तयांचा कवणा । भवभय हरणाशक्त जे ॥ १८९ ॥
इतिश्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचितें ॥
श्रीसाईसमर्थ सच्चरितें । श्रीसंतघोलपराम दर्शनं नाम

द्वादशोऽध्यायः

श्रीसाईनाथार्पणमस्तु । शुभंभवतु ॥

सिंहगड-दर्शनकाव्य हें छोटेसें पुस्तक प्रमोदकर्ते रा. रा. [illegible]
नेरूरकर यांनीं लिहिलें आहे. कवि फर्ग्युसन कॉलेजमध्ये असतांना कॉलेजच्या टेंकडीवरून; एखाद्या नव परिणीत वधू प्रमाणें,

" रोज इथुनि जरि परस्परांतें बघतों तरि नच तृप्ति घडे
बघ सिंहगडा ! पहा मजकडे मीहि पाहतों तुझ्याकडे ! "

असा लपंडाव कांहीं काल खेळून शेवटीं आपल्या संवगड्यासह गडाच्या भेटीस गेला. ही छोटीशी कथा या काव्यांत खुबीनें ग्रथित केली आहे. मुळांतच "सिंहगड" हा विषय महाराष्ट्रीयांना अति प्रिय. त्याला मुख्य कारणें दोन. एक तेथें घडलेला सर्व महाराष्ट्रीयांच्या परिचयाचा मनोवेधक ऐतिहासिक प्रसंग व दुसरें लोकमान्य टिळकांचा सिंहगडा-वरील निवास. असल्या या प्रेमळ विषयावर रा. नेरूरकरासारख्या प्रति-भाशाली कवीनें रचलेलें काव्य; मग तें सर्वांगसुंदर झाल्यावांचून कसें राहील ? रा. नेरूरकर यांची कविता किती उच्च दर्जाची आहे, हें रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर व रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर या दोन रसिक कविवियींनीं या काव्यावर दिलेल्या अभिप्रायांवरून व्यक्त होत आहे. हें काव्य वाचतांना मन पूर्ण रंगून जातें पण शेवटीं मनाचा विरस होतो, तो मात्र काव्य संपलें व हें दृश्य रा. नेरूरकरांनीं अल्प अवधींत आपल्या पुढून नाहींसें केलें म्हणून. रा. नेरूरकरांनीं सिंहगड—दर्शन आमचेकडे अभिप्रायार्थ पाठविलें याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोत.


# श्री साईनाथ भजनमाला.

**सुधारून वाढविलेली आवृत्ति.**

मालेचे कर्ते रा. रघुनाथराव तेंडुलकर यांच्या निधना-नंतर आतां मालेची पुनरावृत्ती छापविणें नाहीं. साईभक्तांनीं माला मागविण्याची त्वरा करावी, कारण प्रती फारच थोड्या शिल्लक राहिल्या आहेत.

सावित्रीबाई तेंडुलकर.

माला मिळण्याचा पत्ता:—

श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर,
रंगाऱ्याची चाळ, वांद्रे
बी. बी. सी. आय. रेल्वे.

श्रीसद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हे पुस्तक मूळ के. रा. स. कृ. जी. भीष्म यांनी शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ति छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाळ आरतीचे वेळी म्हटली जाणारी पदें, व भजनकाळी म्हणावयाजोगीं [illegible] शास्त्री भीष्म यांनी तयार केलेलीं पदें, पुराण व [illegible] पूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

हरि सिताराम दीक्षित.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—श्री साईलीला ऑफीस

रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर,

[illegible] रोड, बांद्रे.

चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी

शिर्डी, पो. राहाते, जि. अहमदनगर.

---


## आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिली जातील, ह. भ. प. संतकवी दासगणू महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी [illegible]पत्री, पृष्ठ सं. ४८ प्र. पु. कि. [illegible] आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास [illegible] किंमतींत पुस्तकें मिळतील.

एकदम सहा पुस्तकांस कि. प्र. फी. सह ३ रु.

ग. [illegible], नांदेड.


---


हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, [illegible] ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनी छापलें व रा. आ. [illegible] यांनीं ५ [illegible] रोड बांद्रे येथें प्रसिद्ध केलें.